दै. गोदातीर दि. 13/06/2024

# वैधरित्या रेती वाहतूक करणाऱ्यांवर कारवाई; १३ वाहने जप्त

**नवीन नांदेड–** ग्रामीण पोलीस ठाण्याच्या हद्दीत अवैधरित्या रेती वाहतूक करणाऱ्या १३ वाहनांसह ५९ ब्रास रेती जप्त करण्यात आली. सदर मुद्देमालाची किंमत १ कोटी ३५ लाख ६५ हजार रूपये एवढी असून याप्रकरणी नांदेड ग्रामीण पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



अवैधरित्या रेतीची चोरटी वाहतूक करणाऱ्या वाहनांवर कारवाई करण्याबाबत पोलीस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे, यांनी स्थागुशाचे पोलीस निरीक्षक यांना आदेशीत केले होते. त्यानुसार दि. ११ जून रोजी पोलीस निरीक्षक उदय खंडेराय यांनी स्थानिक गुन्हे शाखेतील सपोनि संतोष शेकडे, पोउपनि मिलींद सोनकांबळे, पोउपनि साईनाथ पुयड यांच्यासोबत पोलीस अंमलदार यांची अशी तीन पथके नेमून अवैधरित्या रेतीची चोरटी वाहतूक करणाऱ्यांवर कारवाई करण्याच्या सुचना दिल्या. दि. १२ जून रोजी स्थागुशाचे सपोनि संतोष शेकडे, पोउपनि मिलींद सोनकांबळे, पोउपनि साईनाथ पुयड यांच्या पथकाने पोलीस ठाणे नांदेड ग्रामीण, विमानतळ, वजीराबाद हद्दीत पेट्रोलींग दरम्यान मौजे भनगी येथील गोदावरी नदीपात्रातून अवैधरित्या रेतीची चोरटी वाहतुक करणारे ८ हायवा, ४ टिप्पर व १ टेम्पो असे एकुण १३ वाहने, ५९ ब्रास रेती असा एकुण १ कोटी ३५ लाख ६५ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

स्थागुशाचे तिन्ही पथकांचे अधिकारी यांच्या फिर्यादीवरुन नमुद वाहनांचे चालक व मालक यांच्याविरुध्द संबंधीत पोलीस ठाण्या गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

सदरची कामगिरी पोलीस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे, अपर पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार, अपर पोलीस अधीक्षक खंडेराव धरणे यांच्या मार्गदर्शनाखाली स्थागुशाचे पोलीस निरीक्ष उदय खंडेराय, सपोनि संतोष शेकडे, पोउपनि मिलिंद सोनकांबळे, पोउपनि साईनाथ पुयड व स्थागुशाचे पोलीस अंमलदार यांनी पार पाडली आहे. सदर पथकाचे पोलीस अधीक्षक नांदेड यांनी कौतुक केले आहे.

दै. गोदातीर

# अवैध कत्तलीसाठी जाणाऱ्या १५ गोवंशाची सुटका; मांडवी आणि सोनखेड पोलिसांची कारवाई

**नांदेड–** गौवंश कत्तलीसाठी घेऊन जाणाऱ्या वाहनास मांडवी पोलिसांनी ताब्यात घेऊन जवळपास १० गोवंशाची मुक्तता केली. तसेच सोनखेड पोलिसांनीही कारवाई करत तीन गोवंशाला जीवदान दिले.

नाकाबंदी दरम्यान मांडवी पोलिसांनी पाटोदा येथे वाहनाची (टीएस १८- टी- २९४८) हे तपासणी केली असता दहा गोवंश बांधलेल्या अवस्थेत आढळून आले. या प्रकरणी शेख सलीम शेख अझहर (वय ४७, रा.आदिलाबाद) याला अटक केली आणि वाहनासह दहा गोवंश जप्त केले. तपास पोलीस हवालदार गुहाडे करत आहेत.

दुसऱ्या घटनेत सोनखेड पोलिसांनीही महमूद जावेद मुस्तफा (वय ४६, रा. लक्ष्मीनगर, देगलूर नाका, नांदेड) आणि ऑटो चालक शेख पाशा सुभान (वय ४५, मिल्लतनगर नांदेड) या दोघांना ताब्यात घेतले. त्यांच्याकडून तीन गोवंशाची मुक्तता करण्यात आली. सपोनि पांडुरंग माने यांनी कारवाई करत दोघांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.